नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २६० | Issue - 260 | वार गुरुवार दि. ६ फेब्रुवारी २०२५ | Blow- Thursday Date 6 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## रब्बी पेरण्यांमध्ये मोठी वाढ



### तेलबिया, कडधान्यांची हमीभावाने खरेदी न झाल्याचा परिणाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशातील रब्बी हंगामातील एकूण पेरणी क्षेत्रात गतवर्षापेक्षा दहा लाख हेक्टरने वाढ झाली. तेलबियाचे क्षेत्र कमी होऊन, गव्हाची पेरणी सहा लाख हेक्टरने वाढून ३२४ लाख हेक्टरवर पोहचली. तेलबिया, कडधान्यांची हमीभावाने खरेदी न झाल्याचा परिणाम पेरणीवर दिसून आला आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या तेलबिया आणि कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भर होण्याची घोषणा फसली आहे.

देशातील रब्बी हंगामातील सरासरी लागवड क्षेत्र ६३५.३० लाख हेक्टर आहे. गत हंगामात ६५१.४२ लाख हेक्टरवर पे-रणी झाली होती, यंदाच्या रब्बी हंगामात जानेवारीअखेर ६६१.०३ लाख हेक्टरवर पे-रणी झाली आहे. सरासरीच्या तुलनेत २५ लाख हेक्टरने, तर गत वर्षाच्या तुलनेत दहा लाख हेक्टरने वाढ झाली आहे. यंदा उच्चांकी गहू लागवड झाली आहे. देशातील गहू लागवडीचे सरासरी क्षेत्र ३१२.३५ लाख हेक्टर आहे. गतवर्षी ३१८.३३ लाख हेक्टरवर लागवड झाली होती. यंदा ३२४.८८ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे. ही देशातील आजवरची उच्चांकी गहू लागवड आहे. सरासरीच्या तुलनेत १२.५३ लाख हेक्टरने तर, गतवर्षाच्या तुलनेत ६.५५ लाख हेक्टरने गहू लागवड वाढली आहे. उन्हाळी भाताचे देशातील सरासरी क्षेत्र ४२.०२ लाख हेक्टर आहे. गतवर्षी ४०.५९ लाख हेक्टरवर लागवड झाली होती, यंदा ४२.५४ लाख हेक्टवर लागवड झाली आहे. डाळी, कडधान्यांची एकूण लागवड १४०.८९ लाख हेक्टरवर गेली आहे. कडधान्यांचे सरा-सरी क्षेत्र १४०.४४ लाख हेक्टर आहे. गतवर्षी १३७.८० लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. रब्बी हंगामात हरभरा या प्रमुख कडधान्यांचे उत्पादन देशभरात घेतले जाते. हरभरा लागवडीचे सरासरी क्षेत्र १००.९९ लाख हेक्टर आहे. यंदा ९८.५५ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. मसूराची १७.४३ लाख हेक्टर, वाटाण्याची ७.९४ लाख हेक्टर, कुळीथाची २ लाख हेक्टर, उडीद ६.१२ लाख हेक्टर, मुगाची १.४० लाख हेक्टर, लाखेची (लतरी) २.८० लाख हेक्टर आणि अन्य डाळींची ४.६५ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. केंद्र सरकारने प्रयत्न करूनही कडधान्य लागवडीत फारशी वाढ झालेली नाही. श्रीअन्न म्हणजे तृणधान्यांची लागवड ५५.२५ लाख हेक्टरवर झाली आहे. त्यात ज्वारीची २४.३५, बाजरीची ०.१४, नाचणीची ०.७३, लहान तृणधान्यांची ०.१६, बार्लीची ६.२० आणि मक्याची २३.६७ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. मका लागवडीत सुमारे दोन लाख हेक्टरने वाढ झाली आहे. मक्यापासून इथेनॉल निर्मितीला चालना दिल्यामुळे मका लागवड वाढली आहे.

तेलबिया मिशनला फटका

केंद्र सरकार तेलबियांच्या लागवडीवर भर देत असले तरी-ही तेलबियांना हमीभाव मिळत नसल्यामुळे तेलबियांची लागवड गत वर्षाच्या तुलनेत घटली आहे. गतवर्षी ९९.२३ लाख हेक्टरवर तेलबियांची लागवड झाली होती. यंदा ९७.४७ लाख हेक्टवर झाली आहे. रब्बीत मोहरी हे प्रमुख तेलबिया पीक घेतले जाते. गतवर्षी ९१.८३ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती, यंदा ८९.३० लाख हेक्टरवर झाली आहे. त्या खा-लोखाल भुईमूगाची ३.६५, सूर्यफूलाची ०.७४, करडईची ०.७२, तिळाची ०.४२, जवसाची २.२६ आणि अन्य तेलबियांची ०.३९ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे.

## सुरेश धस म्हणजे आधुनिक भगीरथ : फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. डिसेंबर महिन्यातली ही घटना घडून दोन महिने पूर्ण होण्यास आले आहेत. दरम्यान भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी हा प्रश्न लावून धरला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं होतं. तसंच दोनदा या सगळ्या प्रकरणात अजित पवारांची भेट घेतली होती. दरम्यान बीडच्या आष्टीमध्ये देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती होती. देवेंद्र फडणवीस यांनी सुरेश धस यांचा विशेष उल्लेख केला. सुरेश धस यांना त्यांनी आधुनिक भगीरथाची उपमा दिली. तसंच एकदा सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**मुख्यमंत्र्यांनी सुरेश धस यांचं केलं कौतुक**

मराठवाड्याला कृष्णा खोरेचे पाणी मिळाले पाहिजे यासाठी गोपीनाथ मुंडे आणि मराठवाड्याततील अनेक नेत्यांनी केला. पण दुर्दैवाने ते सगळे काम पूर्ण झाले नाही. २३ टीएमसी पाण्यापैकी केवळ सात टीएमसी पाणी सापडले. या भागाचा दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे. जो पर्यंत पश्चिमी वाहिन्यांचे पाणी, थेट समुद्रात जाणारे पाणी गोदावरीमध्ये आणीत नाहीत तोपर्यंत मराठवाडा दुष्काळ मुक्त होणार नाही. त्यासाठी गोदावरीच्या एकात्मिक आराखडा बनवला आहे. त्या माध्यमातून ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आले पाहिजे. मी माझे भाग्य समजतो पुन्हा माझ्यावर जलसिंचनची जबाबदारी आली. या प्रकल्पाचे सगळे अडथळे दूर केले.



असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसंच सुरेश धस यांचा उल्लेख आधुनिक भगीरथ असा केला.

देवेंद्र फडणवीस सुरेश धस यांच्याबाबत म्हणाले, सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असून ते एकदा मागे लागले तर डोकं खाऊन टाकतात. असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. महायुतीचं सरकार असताना त्यांनी मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मेहनत घेतली असं सांगत फडणवीसांनी सुरेश धस यांचे कौतुक केलं.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आष्टी येथील कुंटेफळ साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यात आलं. त्या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते. या तलावामुळे दुष्काळी आष्टी तालुक्यातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

आमदार सुरेश धस यांनी देवेंद्र फडणवीसांचा उल्लेख देवेंद्र बाहुबली असा केला. आमदार सुरेश धस यांच्याकडून भरसभेत फडणवीसांवर कौतुकाचा वर्षाव करण्यात आला. बाकी कोणाकडून अपेक्षा नाही, पण देवेंद्र फडणवीसांकडून अपेक्षा आहे असं सुरेश धस म्हणाले. दरम्यान संतोष देशमुख यांच्या खुनाच्या प्रकरणात सगळ्यांवर कारवाई होणार. या ठिकाणी सगळ्यांना गुण्या गोविंदाने राहायचे आहे. आपण नवीन बीड तयार करू असंही देवेंद्र फडणवीस त्यांच्या भाषणात म्हणाले.

## एक्झिट पोलचा अंदाज; दिल्लीत भाजपा आघाडीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीतील सर्व ७० विधानसभा मतदारसंघातील मतदान संपल्यानंतर, आता विविध वाहिन्या आणि संस्था एक्झिट पोल प्रसिद्ध करत आहेत. आतापर्यंत जाहीर झालेल्या अनेक एक्झिट पोलमध्ये भाजपा आणि आम आदमी पक्ष यांच्यात स्पर्धा दिसून येत आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबतचा एक्झिट पोल हा एक प्रकारचा अंदाज आहे. कधी एक्झिट पोल चुकीचे ठरतात तर कधी बरोबर येतात. दरम्यान दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल ८ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर होणार आहेत. अशात गेल्या तीन निवडणुकांमध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीचे अंदाज कितपत खरे ठरले होते ते पाहुया.

२०१३ मध्ये आम आदमी पक्षाने राजकारणात पदार्पण केल्यापासून एक्झिट पोल अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाच्या निवडणुकीतील कामगिरीच्या व्याप्तीचा अचूक अंदाज व्यक्त करण्यात अपयशी ठरले आहेत. असे असले तरी २०१३ मध्ये दिल्लीतील विधानसभा निवडणुकीत त्रिशंकू परिस्थिती निर्माण होईल, असे अचूक भाकित एक्झिट पोलमधून करण्यात आले होते. मात्र, २०१५ आणि २०२० मध्ये दोन्ही निवडणुका चुरशीच्या होण्याचे अंदाज वर्तवण्यात आले होते. पण, या दोन्ही निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने एकतर्फी विजय मिळवला होता.

२०१३ मध्ये चार एक्झिट पोलमध्ये भाजपा सरासरी ३५ जागांसह आघाडीवर होती. तर आम आदमी पक्ष आणि काँग्रेसला प्रत्येकी १७ जागांवर विजय मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आला होता. पण, प्रत्यक्षात, भाजपाला ३२ जागा, आम आदमी पक्षाला २८ जागा आणि काँग्रेसला फक्त आठ जागा मिळाल्या होत्या. यानंतर अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसने बाहेरून दिलेल्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले होते. पण अवघ्या ४८ दिवसांत त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देत पुन्हा निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला होता.

२०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये सहा एक्झिट पोलनी 'आप'ला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज व्यक्त केला होता. परंतु, त्यांच्या विजयाची व्याप्ती कोणीही सांगू शकले नव्हते. या सहा पोलच्या सरासरीनुसार अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला ४५ जागा, भाजपाला २४ आणि काँग्रेस एका जागा मिळेल असे सांगण्यात आले होते. पण, प्रत्यक्षात 'आप'ने ६७ जागा जिंकल्या, तर भाजपला फक्त तीन जागा मिळाल्या होत्या.

२०२० मध्ये सरासरी आठ एक्झिट पोलमध्ये पुन्हा एकदा 'आप' ५४ जागांसह दिल्ली विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवेल असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तर भाजपाला १५ जागा आणि काँग्रेसला जवळपास एकही जागा मिळणार नाही असे म्हटले होते. प्रत्यक्षात निकालात 'आप'ला ६२ जागा आणि भाजपला आठ जागा मिळाल्या होत्या. यामध्ये काँग्रेसला भोपळाही फोडता आला नव्हता.

## सैफ हल्ला प्रकरण: नर्स लीमा आणि आया जुनू यांनी ओळख परेडमध्ये आरोपीला ओळखले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः अभिनेता सैफ अली खानच्या घरात काम करणाऱ्या नर्स एलियामा फिलिप ऊर्फ लिमा आणि आया जुनू यांनी हल्लेखोराला ओळख परेडमध्ये ओळखले आहे. मुंबईतील आर्थररोड कारागृहात बुधवारी ही ओळख परेड करण्यात आली. वांद्रे येथील सैफ अली खानच्या घरी १६ जानेवारीला झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या फिलीप



यांनी बुधवार आर्थर रोड कारागृहात पार पडलेल्या ओळख परेडदरम्यान अटक आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम फकीर याला ओळखले.

पाच पंच व तहसिलदार यांच्या उपस्थितीत लिमा आणि जुनू यांनी आरोपीला ओळखल्याची माहिती सूत्रांनी दिली. हल्ल्याच्या दिवशी फिलीप यांनी सर्वप्रथम आरोपी शरिफुलला पाहिले होते. हल्लेखोराच्या हातात चाकू आणि काठी होती, आणि फिलीप यांच्याकडे एक कोटी रुपये' देण्याची मागणी केली. त्यानंतर फिलीप आणि सैफचा (पान २ वर...)

## मायदेशी परतलेल्या स्थलांतरितांची चौकशी; अमेरिकेचे लष्करी विमान अमृतसरच्या विमानतळावर दाखल

अमृतसर : अमेरिकेतून १०४ बेकायदा भारतीय स्थलांतरितांना घेऊन आलेले अमेरिकेचे लष्करी विमान अमृतसरच्या श्री गुरू रामदासजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी दुपारी उतरले अशी माहिती सूत्रांनी दिली. यापैकी ३० स्थलांतरित पंजाबचे, हरियाणा व गुजरातचे प्रत्येकी ३३, तसेच महाराष्ट्र व उत्तर प्रदेशचे प्रत्येकी तीन आणि चंडीगडचे दोन आहेत आ-हेत असेही सूत्रांनी सांगितले. मात्र, आलेल्या स्थलांतरितांच्या संख्येबद्दल अधिकृत माहिती मिळाली नाही.

यापूर्वीच्या वृत्तांमध्ये अमेरिकेचे सी-१७ हे लष्करी विमान २०५ बेकायदा स्थलांतरितांना घेऊन येत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सूत्रांनी पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार बुधव-ारी आलेल्या विमानातून १०४ बेकायदा स्थलांतरित परत पाठवण्यात आले आहेत. स्थलांतरितांमध्ये १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

बुधवारी दुपारी १.५५ वाजता अमेरिकेचे विमान अमृतसरला उतरले. विमानतळाबाहेर मोठ्या प्रमाणात बॅरिकेड उभारण्यात आले होते तसेच मोठ्या संख्येने पोलीस तैनात होते. अमेरिकी सरकारने भारतात परत पाठवलेला बेकायदा स्थलांतरितांचा हा पहिला गट आहे. त्यांची पडताळणी केल्यावर आणि पार्श्वभूमी तपासल्यानंतर त्यांना घरी जाऊ देण्याची अपेक्षा आहे असेही सूत्रांनी सांगितले. सर्व स्थलांतरितांची पंजाब पोलिसांसह निरनिराळ्या सरकारी संस्थांकडून चौकशी करण्यात येत आहे. कोणाच्या विरोधात गुन्हा दाखल आहे का हे तपासले जात आहे. काही जणांच्या कुटुंबीयांनी सांगितले की त्यांनी जमिनी विकून आणि २०-२५ लाखांचे कर्ज घेऊन घरातील तरुण मुलांना उज्ज्वल भविष्यासाठी अमेरिकेत पाठवले होते. स्थलांतरितांना परत पाठवण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल पंजाबचे अनिवासी भारतीय विषयक खात्याचे मंत्री कुलदीपसिंग धालिवाल यांनी मंगळवारी नाराजी व्यक्त केली. अमेरिकेतून परत पाठवल्या जाणाऱ्या भारतीयांच्या हा-तात बेड्या घातल्याचे आणि त्यांना अवमानास्पद वागणूक दिल्याचे चित्र दु:खदायक आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेसने बुधवारी व्यक्त केली. यूपीए सरकारच्या काळात भारतीय राजनैतिक अधिकारी देवयानी खोब्रागडे यांना देण्यात आलेल्या अपमानास्पद वागणुकीनंतर अमेरिकेला खेद व्यक्त करावा लागला होता याची आठवणही काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेरा यांनी करून दिली.

### सरकारी विभागांमध्ये नोकरीचा पर्याय स्वीकारा किंवा स्वेच्छा निवृत्ती घ्या

### तिरुमला तिरुपती मंदिर समितीचा निर्णय

## हिंदू नसलेल्या १८ कर्मचाऱ्यांना तिरुपती मंदिर समितीने हटवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : आंध्र प्रदेशातील तिरुमला तिरुपती बालाजी मंदिराशी संबंधित मोठी बातमी समोर आली आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानम मंदिर समितीने मंदिरात कार्यरत असलेल्या पण हिंदू नसलेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवा ठराव मान्य केला आहे. या ठरावानुसार मंदिरात काम करणाऱ्या १८ कर्मचाऱ्यांना हटवण्यात आलं आहे. त्यांच्यासमोर आंध्र प्रदेशच्या इतर सरकारी विभागांमध्ये नोकरीचा पर्याय स्वीकारा किंवा स्वेच्छा निवृत्ती घ्या असे दोन पर्याय ठेवले आहेत. या निर्णयाची चर्चा रंगली आहे.

तिरुमला तिरुपती मंदिर समितीने १८ हिंदू नसलेल्या कर्मचाऱ्यांना हटवण्याचा निर्णय चर्चेत आला आहे. काही महिन्यांपूर्वी चंद्राबाबू नायडूंनी या मंदिराच्या प्रसाद लाडूंमध्ये वायएसआर सरकार असताना शुद्ध तूपाए-ेवजी जनावरांची चरबी वापरण्यात आली असा आरोप केला होता. ज्यामुळे एकच खळबळ माजली होती. त्यानंतर आता याच मंदिर समितीने हिंदू नसलेल्या १८ कर्मचाऱ्यांना हटवलं आहे.

अर्थात तिरुमला तिरुपती देवस्थानम हे स्वतंत्र सरकारी विश्वस्त मंडळ आहे.



जगातल्या श्रीमंत मंदिरांमध्ये तिरुमला तिरुपती बालाजी मंदिराचा समावेश आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार ढढऊ च्या नियमांमध्ये तीनवेळा दुरुस्ती करण्यात आली आहे. १९८९ मध्ये या मंदिराशी संबंधित एक आदेश होता ज्यात असं नमूद करण्यात आलं आहे की मंदिर प्रशासनाच्या प्रशासकीय पदांवर फक्त हिंदूंचीच नियुक्ती झाली पाहिजे. २०२४ मध्ये आंध्र प्रदेशात चंद्राबाबूंचं सरकार आलं. त्यानंतर कथितरित्या तिरुमला तिरुपती मंदिरात काम करणाऱ्या काहींनी त्यांच्या सहकाऱ्यांना दुसऱ्या धर्माच्या लोकांचे सहकारी आह-ेत असं बोललं जात असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. दरम्यान मंदिर प्रशासनात काम करणाऱ्या पण हिंदू नसलेल्या १८ कर्मचाऱ्यांना हटवण्यात आलं आहे. दरम्यान या मंदिर प्रशासकीय सेवेत जे ७ हजार कर्मचारी कायमस्वरुपी तत्त्वावर नोकरी करतात त्यांच्यापैकी ३०० जण हे हिंदू नाहीत. त्यामुळे त्यांना बदली घ्यावी लागणार आहे किंवा स्वेच्छा निवृत्ती घ्यावी लागणार आहे. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.

तिरुमला तिरुपती मंदिर समितीने घेतलेला हा निर्णय संविधानाच्या अनुच्छेद १६ (५) वर आधारित आहे. संविधानातील या तरतुदीनुसार धर्मसंस्था, मंदिरं, धार्मिक स्थळं या ठिकाणी त्याच धर्माचे लोक नोकरीसाठी असावेत. त्यानुसारच हा निर्णय घेण्यात आला आहे.

# माघ यात्रा : वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज : उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले

## १ हजार ४८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी, ६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ शुद्ध जया एकादशी सोहळा आठ फेब्रुवारी रोजी असून, माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली.

माघ वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ४८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०२ पोलीस उपअधिक्षक, ७१ पोलीस निरिक्षक, सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ८०० पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच दोन बीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १३ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी मऊली स्कॉडची स्थापना करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच शहरात व मंदिर, मंदिर परिसर , दर्शन रांग आधी ठिकाणी २६० सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी ६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी १३ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १५ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.



## थोडक्यात...

### विवाहितेचा छळ; पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : व्यवसायासाठी माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये.तरच तुला नांदवितो.नाही तर आमच्या मुलाचे दुसरे लग्न लावून देतो अशी धमकी देत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह





सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी सायमा मोहिद्दीन अत्तार (वय-२३, रा. मुक्तेश्वर नगर, मित्र नगर शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती मोहीद्दीन अत्तार, सासू सावेरा, सासरे मुबारक, पतीचे काका दिलावर अत्तार, काकू हसीना अत्तार, पतीची मावशी साहेरा अत्तार (सर्व रा.मोरवाडी,पिंपरी चिंचवड,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,संशयित आरोपींनी मिळून फिर्यादीस घरातील किरकोळ कारणावरून टोचून बोलून शिवीगाळ व मारहाण करीत. तसेच तुझ्या आई-वडिलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही.लग्नात जास्त भांडी दिली नाही म्हणून संशयित आरोपी पती मोहिद्दीन अत्तार याने माहेरून व्यवसायासाठी दहा लाख रुपये घेऊन ये, नाहीतर तुला नांदविणार नाही. आमच्या मुलाचे दुसरे लग्न लावून देऊ अशी धमकी दिली. तसेच फिर्यादीची शारीरिक, मानसिक, वार्षिक छळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फिर्यादी या सासरी नांदताना २८ जून २०२१ ते ३ डिसेंबर २०२४ च्या दरम्यान फिर्यादीच्या सासरी पुणे येथे घटना घडली.

### जीवे ठार मारण्याचे धमकी देत दहा हजारांची रक्कम पळविली

सोलापूर, (प्रतिनिधी) : शिवाजी चौक सुप्रभात हॉटेल जवळ अनोळखी चौघांनी तुम्ही तरटी नाक्यावर का गेला, इकडे कशाला आला असे म्हणत धक्काबुक्की व दमदाटी करून पैसे न दिल्यास जीवेठार मारण्याची धमकी देऊन खिशातील रोख रक्कम दहा हजार पाचशे रुपये जबरदस्ती काढून घेतल्याची घटना चार फेब्रुवारी रोजी घडली.याप्रकरणी अशोक राजेंद्र बावकर (वय-३०,रा.बावकरवाडी,पो.चपळगाव,ता. अक्कलकोट) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.





### आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये अक्षरा प्रभाकर पोवार हिला कांस्यपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : वडणगे जिल्हा कोल्हापूर येथील शाळेची विद्यार्थिनी अक्षरा प्रभाकर पोवार हिने २ फेब्रुवारी रोजी गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कास्यपदक प्राप्त केले. तसेच हिची नेपाळ काठमांडू येथे होणाऱ्या कराटे स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचे कौतुक होत आहे. तिला मार्गदर्शन वडील प्रभाकर पोवार, आई वनश्री पोवार, आजी, आजोबा व शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. ही सध्या आनंदीबाई बळवंतराव सरनोबत हायस्कूल येथे शिक्षण घेत आहे.

### भाविकांच्या सुविधेसाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना : प्रांताधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी चार आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.



माघ वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका, पत्राशेड,, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

### पुस्तक प्रेम व्यक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/प्रतिनिधी

पुस्तक वाचणारे खूप मिळतात पण पुस्तक भेट म्हणून देणारी कमी माणसं असतात आणि अशी माणसं खूप कमी प्रमाणात समाजात आपल्याला पाहण्यास मिळतात आशीच एक व्यक्ती सामाजिक भान असलेली समाजाप्रती तळमळ असलेली ती व्यक्ती म्हणजे आसनगाव मधील सामाजिक कार्यकर्ते विलास भगवान पवार,यांनी आसनगाव मधील न्यू स्टॅण्डर्ड इंग्लिश स्कूल मध्ये जाऊन तेथील मुख्याध्यापक तसेच इतर नागरिकांस भारताचा राष्ट्रीय ग्रंथ भारतीय संविधान व त्या सोबत मुक्ती कोण पथे ? ही पुस्तके भेट म्हणून दिली.





मूक राहून माणसाला शहाणं, ज्ञानी आणि बोलतं करणार साधन म्हणजे पुस्तक, मानवाच्या जीवनात त्याला खरं मर्म जाणून घेयाच असेल, निखिल मैत्री जर कोणा सोबत करू शकतो तर ते म्हणजे पुस्तक, ही बाब लक्षात घेऊन आता पर्यत दानशूर व सामाजिक कार्यकर्ते विलास भगवान पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित पुस्तक बुद्ध आणि त्याच्या धम्म ह्या पुस्तकाच्या ६० प्रती नागरिकांस भेट म्हणून दिल्या आहेत, त्याच बरोबर माझी आत्मकथा २५ प्रती, मुक्ती कोण पथे ५० प्रती व भारतीय संविधान ४५ प्रती भेट म्हणून आसनगाव मध्ये दिल्या आहेत तसेच त्यांच्या मित्रपरिवार मध्ये देखील भेट म्हणून दिल्या असून भारतीय संविधान हा ग्रंथ कोणास हवे असेल तर ते देण्याचं कबूल देखील केले आहे.. त्यांच्या ह्या उल्लेखनीय कामगरी बाबत अनेक नागरिकांच्या कडून प्रशासना केली जात आहे, त्याच बरोबर त्यांच्या ह्या कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्काराने सन्मातीत करण्यात आले आहे.

## हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन : मनसे नेते दिलीप धोत्रे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शुक्रवारी हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी चे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते उद्धाटन मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.



पंढरपूर तालुक्यातील करकंब जवळ पंढरपूर पासून २० ते २५ मिनिट अंतरावर असलेल्या हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी या पंचतारांकित हॉटेलचे उद्धाटन मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ २५ रोजी होणार असून या कार्यक्रमासाठी माजी गृहमंत्री बाळ नांदगावकर, भाजपचे पक्ष नेते प्रवीण दरेकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, शिवसेनेचे शिवाजी सावंत, मनसेचे अनिल शिदोरे, अविनाश अभ्यंकर, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याण काळे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, उपस्थित राहणार असल्याची माहिती मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देशातून भावी पंढरपूरला श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येत असतात व येणाऱ्या भाविकांची सोय भव्य उद्देशाने पंढरपूर पासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर असलेल्या करकंब जवळ मनसे नेते दिलीप बाप धोत्रे यांच्या संकल्पनेतून हॉटेल ग्रँड या पंचतारांकित हॉटेलची एक लाख चार हजार स्केअर फुट या जागेत निर्मिती करण्यात आली आहे यामध्ये पन्नास रूम ३००० स्क्वेअर फुटाचा ऑल व २५००० स्क्वेअर फुट लोन स्विमिंग पूल, प्रशस्त पार्किंगची सोय करण्यात आली आहे.

त्याचबरोबर हॉटेल श्रेयस रेस्टॉरंट ची मुंबईच्या धर्तीवर निर्मिती करण्यात आली आहे यामध्ये पंचतारांकित हॉटेल प्रमाणे विविध प्रकारच्या जेवणाचे मेनू मिळणार आहे याद्वारे १०० तरुणांना रोजगार मिळणार आहे अशी माहिती मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी दिली.

### दारु बंदी विभाग सुस्त, पोलीस विभागांचे दुर्लक्ष

## मेरा,अंत्री खेडेकर मार्गे अवैध देशी दारुची वाहतूक सुसाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील सिंदखेड राजा मतदारसंघात येत असलेल्या मेरा,अंत्री खेडेकर ह्या मार्गे अवैध देशी दारूची सर्रास वाहतूक चालू असताना दारूबंदी विभाग व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.एकीकडे सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार मनोज कायदे यांनी संबंधित विभागाला अवैध देशी दारू सिंदखेड राजा मतदारसंघात येत असलेल्या प्रत्येक गावातील अवैध देशी दारूचे दुकाने तात्काळ बंद करा असे आदेश देऊन सुद्धा एक महिना उलटून झाला असताना प्रशासनाने आमदाराच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याची पुढे येत आहे.आमदाराच्या आदेशाला केराची टोपली प्रशासनाने दाखवली तर सर्वसामान्यांचे काय असा प्रश्न सर्वसामान्यामधे उपस्थित होत आहे.मेरा अंत्री मार्गे होत असलेल्या अवैध देशी दारू वाहतुकीला कोणाचा वरद हस्त तरुण मुले दारूच्या आहारी जाऊन मरण्याच्या दाढेत असताना





**मुबलक प्रमाणात मिळत असलेल्या दारूने,व्यसनाधीन नवतरुणाई मृत्यूच्या दाढेत.**

दारूबंदी विभाग गेंदाड्याची कातडी घेऊन झोपत आहे का असाही प्रश्न सर्वसामान्याच्या मनात आहे.चिखली तालुक्यात येत राहिल्या शिंदखेडा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अवैध देशी दारूचे दुकानासाठी स्पर्धा चालू आहे.चालू असलेल्या प्रत्येक गावामध्ये अवैध देशी दारूचे दुकान चालू असणाऱ्यांचे चांगभले आहे पण तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन मृत्यूच्या दाढेत आहे असे असताना सुद्धा प्रशासन चुप्पी साधत आहे. असे असताना सुद्धा ड्रायडेच्या दिवशी अनेक गावात देशी दारूचा महापूर सुटत आहे, अवैध देशी दारूमुळेच अनेक नवतरुण व्यसनाधीन होऊन, तसेच मुबलक प्रमाणात मिळत असलेल्या प्रत्येक ठिकाणी दारूमुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडत आहे. तरी संबंधित विभाग व पोलीस प्रशासनाने विविध दाखल घेऊन व्यसनाधीन होत असलेले तरुण यांना समज देऊन अवैध देशी दारू कायमची बंद करण्यात यावी अशी नागरिकांमधून ओरड होत आहे.

### घरगुती, वाणिज्य, औद्योगिक व इतर ग्राहकांचा विज बिल भरण्याकडे कल

### रामाचे पिंपळस, कोठुरे आणि गोंडेगाव या गावांनी १००% वीज बिल भरण्याचा केला निर्धार

## निफाड महावितरण तर्फे पिंपळस रामाचे येथे विज बिल वसुलीसाठी रॅली संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मार्च महिन्या जवळ आल्याने सर्व शासकीय कार्यालयाची थकबाकी वसुलीकडे नेहमीपेक्षा कल मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो याचाच एक भाग म्हणून निफाड उपविभाग अंतर्गत येणाऱ्या रामाचे पिंपळस या गावांमध्ये समस्त घरगुती वाणिज्य औद्योगिक व इतर सर्व ग्राहकांनी चालू वीज दिले व थकीत वीज बिले नियमित भरावी यासाठी एका रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नाशिक परिमंडळाचे प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर कार्यकारी अभियंता केशव काळू माळी यांचे मार्गदर्शनाखाली निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे शाखा अभियंता जितेंद्र बोरसे, अजमीरे सहाय्यक अभियंता, सेवानिवृत्त अभियंता वाणी तसेच जनमित्र हांडगे, प्रवीण पवार, विजय पवार, नागरे अनसे, दिघे, मणियार, साठे , चांदोरे तसेच यंत्रचालक श्री पिठे यांनी मोटरसायकल द्वारे रॅली घेऊन समस्त ग्राहकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

विविध ग्रामपंचायतीतील ग्राहकांनी आपले पूर्ण शंभर टक्के भरण्याचा निर्धार केला व गावच्या गाव हे वीज बिल थकबाकी मुक्त करणारच असा निश्चय यावेळी माजी सरपंच आशिष मोगल, संदीप दाते पुरकर , बाजीराव चांदोरे, या सर्वांनी केला व महावितरण कंपनीच्या सर्व प्रकारचे वीज बिल भरण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांना त्यांनी दिले..

**ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद सदर रॅलीस लाभला. थकित वीज बिल वसुली, प्रधानमंत्री सूर्य घर योजना, अभय योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना अशा विविध योजनांची माहिती यावेळी ग्राहकांना देण्यात आली.**

महावितरण कंपनीमधून निवृत्त झालेले शाखा अभियंता वाणी निवृत्त झालेले असताना देखील, त्यांनी सुद्धा वसुलीमध्ये मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, हे या रॅली चे वैशिष्ट्य ठरले. ग्राहकांमध्ये महावितरण चे वीज बिल भरण्या करतानाचा कल यावेळी दिसून आला.

# माघ यात्रा : वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर प्रशासन सज्ज

## गहिनीनाथ महाराज औसेकर; सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माघ एकादशी मुख्य सोहळा दि. ०८ फेब्रुवारी रोजी असून, यात्रा कालावधी दि.०२ ते १२ फ ेब्रुवारी असा आहे. या यात्रेला सुमारे ४ ते ५ लाख भविक पंढरपूरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघी यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात येणार असून, त्यासाठी पुजांची संख्या कमी करून स.६.०० ते रा.१२.०० पर्यंत दर्शन उपलब्ध राहणार आहे. दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच या यात्रा कालावधीत श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येणार असून, त्याबाबतचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ह.भ.प. वासकर महाराज यांच्या दिंडीची नवमीला श्री.विठ्ठल सभामंडप येथे आरती व अभंग, ह.भ.प.आजरेकर महाराज पंढरपूर यांचा द्वादशीला नैवेद्य, त्रयोदशीला ह.भ.प.औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची परंपरा असून, एकादशीला पहाटे श्रींची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य महोदयांच्या शुभहस्ते सपत्नीक संपन्न होत आहे. याशिवाय, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यांसह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक १०० सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, म ेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रस-ारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

### दर्शन रांगेत भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध; पत्राशेड येथे अन्नछत्र

भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच माळवद-ावर वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. तसेच मयत भाविकांचे त्याच्या मुळगावी शव पोहोच करण्यासाठी मोफत शववाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्वच्छतेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून, मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा इ. ठिकाणची स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्द-तीने करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे.

श्री.संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये दु.१२.०० ते २.०० व रा.७.०० ते ९.०० या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत नवमीपासून चहा-शाबुदाणा, तांदळाची खिचडी तसेच पत्राशेड येथे दशमी, एकादशी व द्वाद-शीला अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंदिर समितीचे संकेतस्थळ (. ीर्ळीींहरश्रींीज्ञाळपळारपवळी. ेीस), मोबाईल अॅप (''श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान, पंढरपूर'') वरून श्रीचे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्राशेड दर्शन रांग व मंदिर परिसरात एल.ई.डी. स्क्रिन बसविण्यात येत आहे. याशिवाय, देण-गी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी ठट उजऊए, ठढत्रड, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच महिला



भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष, चेंजिंग रूम तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडूप्रसाद व त्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री.विठ्ठल रूक्मिणी या ३ भक्तनिवासाम धील ३६१ रूममध्ये सुमारे १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व वारकरी भाविकांना केंद्र बिंदू मानून त्यांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य सर्वश्री आ.रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेश-कुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड.म ाधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे परिश्रम घेत असून सुमारे १८०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी दिली.

# कॉपीमुक्त अभियानाची कडक अंमलबजावणी; सर्व ती आवश्यक यंत्रणेचा वापर करावा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका): फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक इयत्ता १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२ वी शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा दक्षता समिती, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या उपस्थितीत आज दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे पार पडली.

सदर बैठकीमध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर तथा सचिव जिल्हा दक्षता समिती यांनी जिल्ह्यामध्ये इयत्ता १२ वीची १२१ व इयत्ता १० वीची १८४ परीक्षा केंद्रे आहेत. याबाबत माहिती दिली. सदर परीक्षेसाठी जिल्ह्यात इयत्ता १२ वी साठी ११ वी व इयत्ता १० वीसाठी १५ परिरक्षक केंद्र (कस्टडी) आहेत. त्यावर गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या परीक्षांसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांनी दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय व्ही.सी.मध्ये १९८२ च्या कायद्याची कॉपीमुक्त अभियानाची कडक अंमलबजावणी करणेसाठी सर्व ती आवश्यक यंत्रणेचा वापर करावा. व याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

इयत्ता १२ वीची परीक्षा दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ ते १८ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १० वीची परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते १७ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.

इयत्ता १२ वीसाठी ५५ हजार ८७९ व इयत्ता १० वीसाठी ६५ हजार ५८५ इतके विद्यार्थी प्रविष्ठ होत आहेत. सदर परीक्षा केंद्रांसाठी केंद्रसंचालक नियुक्ती करण्यात आलेले असून जिल्ह्यात इयत्ता १२ वीसाठी ३४ व इयत्ता १० वीसाठी ४७ संवेदनशील केंद्रे आहेत अशी माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांनी बैठकीमध्ये दिली. या परिक्षा केंद्रावर विशेष पोलीस बंदोबस्त व बैठे पथक नेमण्यात आ-लेले आहे. या परिसरात १४४ कलम लागू करणेबाबत जिल्हाधिकारी यांनी पोलीस आयुक्त शहर व पोलीस अधीक्षक, ग्रामीणच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. संवेदनशील केंद्रावर व ज्याठिकाणी मास कॉपी चालते त्याठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून व्हिडीओग्राफीसाठी व्हिडीओग्राफर उपलब्ध करून देण्यात येतील असे सांगितले.

तालुकास्तरावर जिल्हाधिकारी यांचेमार्फत तहसिलदार, नायब तहसिलदार यांचेकडून फिरते पथक व बैठे पथक नियुक्त करण्यात येतील त्यामध्ये ग्रामसेवक, तलाठी यांची व इतर आवश्यक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. तर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचेमार्फत जिल्हा परिषदेतील खातेप्रमुखांची फिरते पथकामध्ये नियुक्त करण्यात येईल.

संवेदनशील परीक्षा केंद्र अथवा गाव जेथे १४४ कलमाची कडकपणे अंमलबजावणी करण्यात येईल व गावातील प्रतिष्ठित ४ ते ५ लोकांचे संपर्क क्रमांक घेवून त्यांचेकडून गा-वातील याबात माहिती घेतली जाईल. एका ठिकाणी कंट्रोल रूम तयार करण्यात येईल. ज्याठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद विभाग, पोलीस विभाग व शिक्षण विभाग यांचे प्रतिनिधी नियुक्ती करण्यात येतील. यामार्फत जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रावर विशेषत: संवेदनशील केंद्रावर लक्ष ठेवण्यात येईल. ज्या परिक्षा केंद्रावर गैरकृत्य आढळून आल्यास फिरते पथकास व पोलीस विभागास माहिती दिली जाईल व संबंधितावर पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

तसेच परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विशेष आरोगय सेवा पुरविणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सुचना देण्यात आली. त्यादृष्टीने आवश्यक असलेल्या परीक्षा केंद्रावर बैठे आरोगय पथक व तालुक्यात एक फिरते आरोग्य पथक नियुक्त करण्यात यावे असे जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले.

या परीक्षांसाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट), वेळापूर, शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक, योजना जिल्हा परिषद, सोलापूर यांचेही फिरते पथक सक्रिय राहील अशा सुचना दिलेल्या आहेत.

या दक्षता समितीच्या बैठकीसाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त शहर व पोलीस अधिक्षक ग्रामीण यांचे प्रतिनिधी, प्राचार्य जिल्हा परिषद, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक, सहा. शिक्षण उपनिरीक्षक उच्च माध्यमिक सोलापूर उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर तथा सचिव जिल्हा दक्षता समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली : राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर : कर्मवीर डॉ.मामास-ाहेब जगदाळे यांनी १९३४ साली बार्शी येथे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली . खेड्यापाड्यातील मुले शिक्षणा-पासूण वंचित राहू नये, त्यांना चांगले शिक्षण घेता यावं यासाठी वस्तीगृह काढले. मामांचे शैक्षणिक कार्य अत्यंत प्रतिकूल परस्थित निम ाण झाले असून, त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली. असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले.




श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी कर्मवीर डॉ.मामास-

### कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार प्रदान सोहळा

ाहेब जगदाळे पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम प्रंसगी ते बोलत होते. यावेळी उपद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर, उपद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष श्री.एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेट्ररी श्री.पी.टी.पाटील, जॉईट सेक्रेटरी श्री.ए.पी.टेबडवार,खजिनदार श्री.शितोळे, विदयार्थी,आदीमान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले, वसतीगृह चालविण्यासाठी मामांनी लोकांकडून धान्य गोळा करणे निधीची उपलब्धता करणे यासाठी अथक प्रयत्न केले. वसतिगृह चांगल्या प्रकारे सुरू झाले. लोकांनी दिलेले दान सतपात्री लागावं आणि ते जगदाळे मामांच्या रूपाने सतपात्री लागत होतं त्यामुळे लोकांनी ही भरभरून दान दिले. महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी शिंदे यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

कर्मवीर डॉ.मामासाहेब जगद-ाळे यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचा विस्तार म ोठ्या प्रमाणात झाला आहे. डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर. या दोन्ही व्यक्तींचे कर्तव्य मोठे आहे. शास्त्रज्ञाला स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतः कष्ट करून मोठे व्हावे लागते असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सर्व सामान्य लोकापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे काम तसेच ग्रामीण भागा-तील विदयार्थ्यांचे आयुष्य घडविण्याचे प्रचंड मोठे काम डॉ.मामासाहेब जगद-ाळे यांनी केले असल्याचे डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाप्रसंगी डॉ.अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, यांना राज्यपाल श्री.हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह,सन्मानपत्र रुपये एक लाख रुपयांचा धनादेश देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### साकेत बुद्ध विहारात ९० वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

### मेश्राम बी. बी. यांचे प्रतिपादन

# बोटिला छिद्र पाडायचे किंवा नाही हे आपणच ठरविले पाहिजे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व साकेत बुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यम ाने साकेत नगरातील साकेत बुद्ध विहारात मूकनायकच्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता या विषयावर ९० वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ३१ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाजात असे काही कार्यकर्ते आहेत, ज्यांना त्यानीच किती काळ चळवळीचे कार्य करावे? इतरांनी का करू नये? असे त्यांना वाटत असते. जसे काही त्यांनी फुले शाहू आंबेडकरांपेक्षा चळवळीचे जास्त काम केले असल्याचा आव आणला जातो. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला सुरू केलेल्या मूकनायकच्या पहिल्याच अंकातील मनोगतात स्पष्ट केले आहे की, या समाज नौकेतून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांनी लक्षात ठेवले पाहिजे की, जर एखाद्या प्रवाश्यास इतर प्रवाश्याविषयी घृणा वाटत असल्याने त्या प्रवाश्याचा मृत्यू व्हावा म्हणून या सुज्ञ प्रवाश्याने बोटिला छिद्र पाडून बोट बुडविण्याचा प्रयत्न केल्यास इतरांबरोबर छिद्र पाडणा-या सुज्ञ व्यक्तीचा सुद्धा मृत्यू होईल. म्हणून बोटिला छिद्र पाडायचे किंवा नाही हे त्या सुज्ञ व्यक्तींसह आपणच ठरविले पाहिजे. इतर कुणी कार्यात सहभागी होवोत अथवा न होवोत पण ज्यांना चळवळ कळली त्यांनी मात्र कुणाची वाट न पाहता चळवळीत सहभागी झालेच पाहिजे? अन्यथा त्या व्यक्तीचे नाव सुद्धा चळवळ न कळणाऱ्या व्यक्तींच्या यादीत समाविष्ट होईल.

द्वितीय अंकातील स्वराज्याची सर सुराज्याला नाही! या संपादकीय लेखात इंग्रजी शिक्षण हे वाघिणीचे दुध असल्याचे स्पष्ट करून जो प्राशन करील तो गुरगरेल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ब्रिटिश सरकारने




भारतीयांना मानवतावादी दृष्टीकोनातून इंग्रजी शिक्षण दिल्याने आपण गुलाम असून फसवणूक होत असल्याची जाणीव झाल्याने त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला परिणामी पुढे स्वातंत्र्य मि ळाले. याची सर्व शासकांना जाणीव असते, म्हणून ते जनतेला सुयोग्य शिक्षण देत नसतात. परिणामी शाळा बंद पाडल्या जातात. त्या काळात अस्पृश्य हिताची चर्चा करणारी सोमवंशीय मित्र, हिंदू नागरिक, विटाळ विध्वंसक सारख्या पत्रांचा उदय व अस्त झाला परंतु दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी म राठा, ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका इत्यादी वृत्तपत्रे सुरू होती. मात्र यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आ-पले म्हणणे मांडण्यासाठी हवी तेवढी जागा दिली जात नव्हती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली. ज्यात अग्रलेख, क्षेम समाचार, शेलापागोटे, कुशल प्रश्न, विविध विचार, वर्तमानसार, आमची जखम, आमची हालचाल इत्यादी सदर चालविले जात होते. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आजही दिशादर्शक आहे. या अनुषंगाने आपण कुठे आहोत? याचा शोध घेऊन प्रासंगिकता समजून घेतली पाहिजे.

यांप्रसंगी उद्घाटक बुद्धभुषण जाधव म्हणाले की, मूकनायक पत्रकारितेतील महिलाचा दगड आहे. जगण्याचे भांडवल न होऊ देता आपण आपल्या भूमिका पार पाडल्या पाहिजेत. प्रमुख वक्ते डॉ. मिलिंद आठवले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात करून भाषेचा, विविध विषयाचा अभ्यास करून सर्व समावेशक व्यापकता लक्षात घेऊन पत्रकारिता केली होती. शिक्षण, मनोरंजन व ज्ञान ही पत्रकारितेची त्रिसूत्री आहे. वाचकांची मने आणि मनगटे सक्षमीकरणासाठी लेखणी वा-परली पाहिजे. प्रस्थापित पत्रकारीतेत परिवर्तनवादाला तिलांजली देऊन अनावश्यक मजकूर छापला जातो. करिता आपण परिवर्तनवादाचे वाहक झाले पाहिजे.

याप्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, ज्यांना वाचता, बोलता येत नव्हते त्यांना व्यक्त होण्याची संधी मूकनायक ने निर्माण करून दिली होती. निष्पक्ष मते मांडण्यासाठी मूकनायक सारख्या पत्रकारितेची आवश्यकता आहे. भीमराव गाडेकर म्हणाले की, मुक्यांचा जो नायक तो मूकनायक होय. गतवैभव प्राप्त करून घेण्यासाठी पत्रकारिता केली पाहिजे. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, परभणी ते मुंबई लाँगमार्च काढल्याची बातमी मीडियात नाही. एड. विलास रामटेके म्हणाले की, समाजाची व्यथा समाज माध्यमांद्वारे शासन प्रशासनापर्यंत पोहचवली पाहिजे. सुभाष ठोकळ म्हणाले की, चळवळीचे मारेकरी कोण? याची जाणीव करून देणारी पत्रकारिता असावी.

सुरुवातीला आदर्शांना म ान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर बुद्ध विहार समितीच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला समितीचे अध्यक्ष इंजिनिअर भास्कर म्हस्के हे आवर्जून उपस्थित होते. कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने व प्रास्ताविक प्रा. सुनील दाभाडे तर आभार प्रा. रामप्रसाद डोंगरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला प्रज्वलित बनसोडे, एड. आम्रपाली वाव्हाळे, साधू आनंद, रमेश जाधव, दिनकर जाधव, मधुकर साळवे, सु-धीर सुरडकर, शिला जाधव, महादेव डांबरे, इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.